सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

NATIONAL HEALTH MISSION
राष्ट्रीय स्वास्थ्य मिशन

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
**जिल्हा महिला व बाल रुग्णालय, कुडाळ**
कुडाळ तहशिलदार कार्यालय समोर, तालुका कुडाळ,
जिल्हा सिंधुदुर्ग, पिन कोड नं. ४१६ ५२०

सत्यमेव जयते
Government of Gujarat

*दूरध्वनी क्रमांक (०२३६२)-२९९४३४*
Email Address :- dwchsindhudurg@gmail.com


बेटी बचाव, बेटी पढाव

कागद वाचवा, वृक्ष वाचवा

जा.क्रं./जिमबालरुकु/भांडार/खिडक्यांना पडदा खरेदीसाठी दरपत्रक/ ५४७ /२०२६
दिनांक :- १७/०२/२०२६

## दरपत्रक जाहिर सूचना

वैद्यकीय अधिक्षक वर्ग — १ , जिल्हा महिला व बाल रुग्णालय, कुडाळ या रुग्णालयातील सर्व विभागातील खिडक्यांना पडदे बसविण्याकरीता मान्यताप्राप्त व इच्छुक स्थानिक दुकानदार / पुरवठादार यासंकडून रुग्णालयातील खिडक्यांना लागणारे पडदे व रॉड खरेदी करायचे आहे. याकरीता या नोटीसद्वारे विहित नमुन्यात दरपत्रक मागविण्यात येत असून नोटीस मिळाल्यापासून आपल्याकडून सिलबंद लखोटयात **"वैद्यकीय अधिक्षक वर्ग १, जिल्हा महिला व बाल रुग्णालय, कुडाळ"** यांच्या नावे दरपत्रक जिल्हा महिला व बाल रुग्णालय, कुडाळ येथे **"रुग्णालयातील खिडक्यांसाठी पडदे व रॉड सेट खरेदी करण्यासाठी दरपत्रक"** असा उल्लेख केलेला असावा. दरपत्रक कार्यालयीन वेळेत समक्ष किंवा पोस्टाने सात दिवसाच्या आत दिनांक २६/०२/२०२६ रोजी संध्याकाळी ५.०० पूर्वी मिळतील असे पाठवावे. मुदतीनंतर प्राप्त झालेली दरपत्रक स्वीकारली जाणार नाही.

| अ. क्रं. | कामाचे स्वरुप / तपशील | Window Size | Rate Per Sq. Ft | GST % | GST Amount | Total Price including GST |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Steel Curtain Rod set, Size Length १०-१२ feet, Quality of Rod — Medium & Simple | ०९-१० Feet (Length) | | | | |
| २ | Window Curtain — Plain Green Colour. Material — Polyester Thickness of Fabrics — That hold sunlight | ०७ — ०८ Feet (Height) | | | | |

इच्छुक व्यवसायिकांनी वरील प्रमाणे बाबनिहाय सिलबंद लिफाफा दरपत्रके दिनांक १८/०२/२०२६ पासून २६/०२/२०२६ पर्यत संध्याकाळी ५.०० पर्यत या कार्यालयास करावेत.

**** इच्छुक व्यवसायिकांनी दरपत्रक सादर करण्याआधी कार्यालयीन वेळेत रुग्णालयात प्रत्यक्ष येऊन कामाचे स्वरुप समजून घ्यावे व नंतरच दरपत्रक सादर करावे.**

**दरपत्रक सादर करताना सोबत पुढील कागदपत्रे असणे आवश्यक आहे —**

१. शॉप ॲक्ट लायसन्स / संस्था किंवा व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र झेरॉक्स प्रत अथवा
२. सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे नोंदणी केलेले प्रमाणपत्रची झेरॉक्स प्रत
३. जी एस टी प्रमाणपत्र झेरॉक्स प्रत किंवा प्रमाणपत्र नसल्यास लेखापरिक्षक (CA) यांनी प्रमाणित केलेल्या प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत
४. उद्यम नोंदणी प्रमाणपत्र
५. पॅन कार्ड व आधारकार्ड झेरॉक्स प्रत
६. बॅक पासबुक पहिल्या पानाची झेरॉक्स

**अटी व शर्ती**

१. संपूर्ण दरपत्रक अथवा त्याचा भाग कोणत्याही वेळी कोणतेही कारण न दर्शविता स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार मा. वैद्यकीय अधिक्षक वर्ग १, जिल्हा महिला व बाल रुग्णालय, कुडाळ यांनी राखून ठेवलेला आहे.
२. दिनांक १८/०२/२०२६ ते २६/०२/२०२६ या कालावधीत ठिक ५.०० वाजेपर्यत कार्यालयीन वेळेत सीलबंद लिफाफा पध्दतीने दरपत्रके स्विकारण्यात येतील.
३. इच्छुक पुरवठाधारकांनी मोहोर बंद दरपत्रके दिनांक २६/०२/२०२६ रोजी संध्याकाळी ५.०० पूर्वी जिल्हा महिला व बाल रुग्णालय, कुडाळ या कार्यालयात सीलबंद लखोटयामध्ये सादर करावे. त्यानंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. दरपत्रकाच्या लखोटयावर **"रुग्णालयातील खिडक्यांसाठी पडदे व रॉड सेट खरेदी करण्यासाठी दरपत्रक"** असे नमूद करावे. डाव्या बाजूस पुरवठादार संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता शिक्यासहित ठळकपणे नमूद करावे.
४. दरपत्रक **"मा. वैद्यकीय अधिक्षक वर्ग १, जिल्हा महिला व बाल रुग्णालय, कुडाळ"** या नावाने सादर करावे.
५. पुरवठादाराने चालू वर्षातील संस्था नोंदणी प्रमाणपत्र / शॉप ॲक्ट प्रमाणपत्र, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र, उद्यम नोंदणी प्रमाणपत्र, पॅनकार्ड व आधारकार्ड यांच्या झेरॉक्स प्रत
६. जीएसटी नोंदणी लागू नसल्यास त्याबाबतचे सी ए चे प्रमाणपत्र जोडावे. (टॅक्स कन्सल्टंटचे प्रमाणपत्र ग्राहय धरले जाणार नाही.)
७. **दरपत्रकातील दर हे सर्व करासहित, उचलठेव, हमाली, वाहनतळ व फिटींग मंजुरीसहीत नमूद करावे.**

८. रुग्णालयातील खिडक्यांना रॉड व पडदे लावण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर अनुदान उपलब्धते प्रमाणे देयक रक्कम मंजूर दराप्रमाणे स्पर्श प्रणालीद्वारे अदा करण्यात येतील. त्याकरीता बॅक खात्याची माहिती सोबत सादर करावी.

९. जीएसटी दरामध्ये वाढ झाल्यास दरामध्ये वाढ करण्याबाबतचा निर्णय या कार्यालयाकडे राहिल.

१०. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

११. दरपत्रक मंजूर झाल्यानंतर पुरवठा आदेशाप्रमाणे जिल्हा महिला व बाल रुग्णालय, कुडाळ या रुग्णालयातील खिडक्यांना रॉड व पडदे लावण्याचे काम ७ दिवसात चालू करावयाचे आहे.

१२. पुरवठा आदेशानुसार विहित कालावधीत साहित्याचा पुरवठा न झाल्यास किंवा पुरवठा केलेले साहित्य निकृष्ठ दर्जा असल्याचे आढळून आल्यास ते साहित्य बदलून पुन्हा नविन देणे बंधनकारक राहील.

१३. इच्छुक पुरवठाधारकाने सोबत सादर केलेल्या नमुन्यातील बंधपत्र संबंधित पुरवठाधारकाच्या लेटरहेडवर लिहून सादर करावे.

Dist. Women & Child Hospital * Sindhudurg - Kudal. * सत्यमेव जयते

वैद्यकिय अधिक्षक, वर्ग-१
जिल्हा महिला व बाल रुग्णालय
सिंधुदुर्ग - कुडाळ

# बंधपत्र

मी / आम्ही गांभीर्य पूर्वक नमूद करतो की मी / आम्ही वर नमूद केलेल्या साहित्य पुरवठा कामाच्या सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचल्या असून या निविदेसाठी माझे / आमचे दर निविदेसोबत असलेल्या प्रपत्र अ मध्ये नमूद करीत आहे / आहोत.

जर माझे / आमचे दरपत्रक स्वीकृत करण्यात आले तर निविदेमधील सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यास मी / आम्ही बांधील राहू. या अटी व शर्तीचा भंग मी / आम्ही केल्यास या दरपत्रकातील अटी व शर्तीमध्ये दिलेल्या तपशीलनुसार मी / आम्ही दंडनीय कार्यवाहीस पात्र राहू.

मी / आम्ही दरपत्रकात दिलेल्या साहित्य पुरवठा प्रपत्र मधील तपशीलनुसार अट १ ते १३ करीता बांधिल राहू.

वरील सर्व अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहे.

स्थंळ —

दिनांक —

दरपत्रकधारकांची सही व शिक्का

नाव —

पत्ता —